।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION (CONVOCATION) SECTION

| Phone: (02462) 229242<br>Fax No. (02462) 229250 | Website:<br>www.srtmun.ac.in | E-mail:<br>srtmuncoe@gmail.com |
|---|---|---|

जा क्र./दीक्षांत/२०१८–१९/12915

दिनांक : ३१.०७.२०१८ 14 08

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : पदवी आवेदनपत्र महाविद्यालयात विक्रीस ठेवणे व स्वीकारणे बाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यांत येते की, प्रस्तुत विद्यापीठाचा **एकविसावा** दीक्षांत समारंभ साधारणत: जानेवारी/फेब्रुवारी २०१९ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून विहीत नमुन्यातील पदवी आवेदनपत्र दिनांक ३१/०८/२०१८ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत.

पदवी आवेदनपत्र स्वीकारण्याचा कालावधी दिनांक ३१/०८/२०१८ हा निश्चीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार पदवी आवेदनपत्र परिपूर्ण असल्याची खात्री करुनच विद्यार्थ्यांकडून आवेदनपत्र स्वीकारावेत.

पदवी आवेदनपत्र स्विकारण्याच्या विहीत मूदतीनंतर दिलेल्या तारखेनुसार विद्यार्थ्यांकडून स्वीकारलेली पदवी आवेदनपत्रे व शुल्क दीक्षांत कक्षात जमा करणेबाबतची सूचना सोबत जोडली आहे त्याप्रमाणेच पदवी आवेदनपत्र विद्यापीठात जमा करावेत. तसेच सदर सूचनापत्र विद्यार्थ्यांसाठी सुचना फलकावर लावावे.

आपला,

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

EXAMINATION (CONVOCATION) SECTION

| Phone: (02462) 229242<br>Fax No. (02462) 229250 | Website:<br>www.srtmun.ac.in | E-mail:<br>srtmuncoe@gmail.com |
|---|---|---|

जा क्र./दीक्षांत/२०१८–१९/12915

दिनांक : ~~३१.०७.२०१८~~ 14.08.२०१८

## दीक्षांत आवेनदपत्र सादर करणेबाबत सूचना

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा **एकविसावा** दीक्षांत समारंभ साधारणत: जानेवारी/फेबुवारी २०१९ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. समारंभाचा दिनांक व वेळेबाबत वृत्तपत्रांमधून व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येईल.

**उन्हाळी–२०१८** मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत संबंधीत महाविद्यालयात पदवी आवेदनपत्र सादर करता येतील तर **हिवाळी–२०१७** मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी आवेदनपत्र **१ ते ३० सप्टेंबर २०१८** पर्यंत दीक्षांत विभागात सादर करावेत. पांढ–या रंगाचे आवेदनपत्र भरल्यास दीक्षांत समारंभात उपस्थित राहून आणि गुलाबी रंगाचे आवेदन पत्र भरल्यास टपाल सेवेने (By Post) पदवी/पदविका प्रमाणपत्र घेता येईल. टपालाने पाठविण्यात येणारे पदवी प्रमाणपत्र दीक्षांत समारंभानंतर पाठविण्यात येतील.

**हिवाळी–२०१७** पूर्वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आपले पदवी आवेदनपत्र नियमित विद्यार्थ्यांचा पदवी आवेदनपत्र भरण्याच्या कालावधी नंतर आपल्या आवेदन पत्रासोबत **रु. २००/–** व प्रतिवर्ष विलंब शुल्क **रु.५०/–** प्रमाणे शुल्क दीक्षांत कक्षात सादर केल्यानंतर १५ दिवसात पदवी प्रमाणपत्र विद्यापीठात किंवा पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात येतील. (अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत पदवी प्रमाणपत्राचे मुळ शुल्क व विलंब शुल्क मिळून एकूण शुल्क रु.५००/– पेक्षा अधिक असणार नाही.)

०१.**आवेदनपत्राची उपलब्धता** : विहीत नमुन्यातील छापील आवेदनपत्र संलग्नीत महाविद्यालयात व विद्यापीठाच्या प्रकाशन विभागात दहा रुपयात उपलब्ध होतील. पदवी आवेदनपत्र विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यावरुन डाउनलोड केलेल्या आवेदनपत्रासाठी विहीत शुल्काव्यतिरिक्त **रु.१०/–** अतिरीक्त भरावे लागेल.

०२. **पदवी प्रमाणपत्र शुल्क :**

(अ) दीक्षांत समारंभात उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी **रु.१७०/–**(पदवी प्रमाणपत्र शुल्क–रु.१५० व नोंदणी शुल्क–रु.२०)

(ब) टपालाने पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी **रु.२२०/–** (पदवी प्रमाणपत्र शुल्क–रु.२०० व नोंदणी शुल्क–रु.२०)

हिवाळी–२०१७ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र शुल्क रु. २००/– व प्रतिवर्षी विलंब शुल्क रु.५०/– भरावे लागेल. (अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत पदवी प्रमाणपत्राचे मुळ शुल्क व विलंब शुल्क मिळून एकूण शुल्क रु. ५००/– पेक्षा अधिक असणार नाही.)

०३. **आवेदनपत्र दाखल करणे** : आवेदनपत्र (फॉर्म) विद्यापीठाच्या दीक्षांत कक्षात किंवा संबधीत महाविद्यालयात दाखल करता येतील.

**०४. महाविद्यालयांनी विद्यापीठात आवेदनपत्र दाखल करण्याचा दिनांक :**

**अ)** ज्या महाविद्यालयांनी **उन्हाळी–२०१८** परीक्षा आवेदनपत्रासोबत पदवी आवेदनपत्र भरुन घेतलेले असतील त्यांनी केवळ उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचेच परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठात सादर करावेत.

**ब)** उन्हाळी–२०१८ परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर दिनांक ३१ ऑगष्ट, २०१८ पर्यंत संबंधीत महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पदवी आवेदनपत्र सादर करता येतील व अशा विद्यार्थ्यांच्या पदवी आवेदनपत्राचे शुल्क NEFT/RTGS व्दारे विद्यापीठात दिनांक **०५ सप्टेंबर, २०१८** पर्यंत जमा करावेत.

**क)** जे विद्यार्थी ३१ ऑगष्ट, २०१८ पर्यंत पदवी आवेदनपत्र सादर करु शकले नाहीत त्यांनी पदवी आवेदनपत्र संबंधीत महाविद्यालयात दिनांक ०१/०९/२०१८ ते ३०/०९/२०१८ पर्यंत **विलंब शुल्क रु.५० सह** सादर करावेत. त्यांचे पदवी शुल्क NEFT/RTGS व्दारे विद्यापीठात दिनांक **०५ ऑक्टोबर, २०१८** पर्यंत भरावेत.

वरील **अ,ब व क** प्रमाणे घेतलेले पदवी आवेदनपत्र विद्यापीठात दिनांक **१० ऑक्टोबर, २०१८** पर्यंत जमा करावेत

**टीप :**

०१) उपस्थित राहून पदवी/पदविका प्रमाणपत्र घेण्यासाठी आवेदनपत्र सादर केलेल्या (पांढ–या रंगाचे आवेदनपत्र भरलेल्या) विद्यार्थ्यांनी त्यांचे पदवी प्रमाणपत्र दीक्षांत समारंभाच्या वेळीच घेणे आवश्यक आहे. दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र घेत असल्यास **रु.५०/–** विलंब शुल्क भरावा लागेल.

२) पदवी आवेदनपत्रावर आवश्यक ती पूर्ण माहिती भरलेली असावी. अर्धवट किंवा चूकीच्या पध्दतीने भरलेले आवेदनपत्र रद्द समजले जातील.

३) पदवी आवेदनपत्रावर विहीत ठिकाणी विद्यार्थ्यांच्या स्वाक्ष–या असाव्यात तसेच विहीत ठिकाणी फोटो लावून साक्षांकन केलेले असावे.

४) आवेदनपत्रासोबत संबधीत परीक्षेच्या गुणपत्रिकेच्या सर्व वर्षाच्या साक्षांकीत छायाप्रती जोडलेल्या असाव्यात.

५) बी. फार्मसी च्या पदवी आवेदनपत्रासोबत किमान एक महिना कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे सर्टीफिकेट तसेच एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस साठी इंटरनशीप कंप्लिशन सर्टीफिकेट जोडलेले असावे, असे इंटरनशीप सर्टीफिकेट ऑक्टोबर २०१७ पूर्वीचे असणे आवश्यक आहे.

७) गुणवत्ता सुधारणा करणा–या (Improvement) विद्यार्थ्यांच्या पदवी आवेदनपत्रासोबत Improvement केलेल्या व त्यापूर्वीच्या पूर्ण वर्षाच्या गुणपत्रिकेच्या छायांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे तसेच यापूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतलेले असेल तर ते मुळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे.ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतलेले नाही त्यांनी यापूर्वी संबधीत परीक्षेचे पदवी प्रमाणपत्र घेतले नाही, असा आवेदनपत्रावर उल्लेख करावा.

८) जे विद्यार्थी दीक्षांत समारंभासाठी अर्ज करण्याच्या विहीत कालावधीत आवेदनपत्र सादर करणार नाहीत त्यांना दीक्षांत समारंभानंतर वर्षभर रु.२००/– शुल्क व प्रतिवर्ष विलंब शुल्क रु.५०/– भरुन पदवी प्रमाणपत्र घेता येईल

९) जे विद्यार्थी हिवाळी–२०१७ च्या पूर्वी उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील दीक्षांत कक्षात रु.२००/– शुल्क व प्रतिवर्ष विलंब शुल्क रु.५०/– भरुन पदवी आवेदनपत्र सादर करावीत व पदवी प्रमाणपत्र स्वत: हस्तगत करावे. (अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत पदवी प्रमाणपत्राचे मुळ शुल्क व विलंब शुल्क मिळून एकूण शुल्क रु.५००/– पेक्षा अधिक असणार नाही.) अशा विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभाच्या वेळी पदवी प्रमाणपत्र घेता येणार नाही.

१०) महाविद्यालयात किंवा विद्यापीठाच्या दीक्षांत कक्षात पदवी आवेदनपत्र सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांना पावती देण्यात येईल. **ही पावती दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र घेतांना कार्यालयात जमा करावी लागेल. त्याशिवाय पदवी प्रमाणपत्र मिळणार नाही.** शिवाय ज्या विद्यार्थ्यांनी अशी पावती हरवली आहे अशा विद्यार्थ्यांनी संबधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून विद्यार्थ्यांने पदवी आवेदनपत्र भरले असल्याचे व ते आवेदनपत्र विद्यापीठात दाखल केले असल्याचे प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभात सर्व विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्र वाटप झाल्यानंतर आवेदनपत्र प्राप्त झाल्याची खातरजमा करुन पदवी प्रमाणपत्र देण्यात येईल.

११) ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच दीक्षांत समारंभात उपस्थित राहुन पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी पदवी आवेदन पत्र सादर केलेले आहे पण अद्यापपर्यंत पदवी प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा विद्यार्थ्यांनी आपले पदवी प्रमाणपत्र प्रस्तुत विद्यापीठातील दीक्षांत कक्षाच्या काउंटर वरून स्वत: घेवून जावे.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ